# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०१.०५.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा युनिट क्र. ०४ पोलीसांची कामगिरी :— घरफोडी व वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक. ०३ गुन्हे उघडकीस.**

दिनांक २५.०४.२६ रोजी पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, रो—हाऊस क्र. ८४, व्यंकटेश नगर, आयुर्वेदीक हॉस्पिटल समोर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी आकाश वामनराव फिरके, वय ३२ वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून परिवारासह त्यांचे मावस बहिणीचे लग्न समारंभाकरीता कोराडी येथे गेले होते. दिनांक २९.०४.२०२६ रोजी, फिर्यादीची पत्नी यांनी त्यांचे मोबाईलवरुन घराचे सीसीटिव्ही फुटेज बघीतले असता, त्यांना घराचे दरवाज्याचे कुलूप तुटलेले व दरवाजा उघडा दिसुन आला. फिर्यादी यांनी सीसीटिव्ही फुटेजची पाहणी केली असता, दिनांक २९.०४.२०२६ चे ०१.०० वा. चे सुमारास, अनोळखी ०३ ईसमांनी फिर्यादीचे घराचे कुलूप तोडून, आत प्रवेश करुन, सोन्या—चांदीचे दागिने, जुने टायटन घड्याळ व रोख ५,००० रु. असा एकूण १,५६,८००/— रु. चा मुद्येमाल चोरुन नेताना दिसून आले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे अनोळखी ०३ आरोपींविरूध्द कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासात, गुन्हेशाखा युनिट क्र. ०४ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून आरोपी क्र. १) दशरथ उर्फ लक्की बद्दुलाल साखरे, वय २० वर्षे, रा. विजय नगर, कळमणा रोड, शिवा पान मंदीरजवळ, कळमणा, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद घरफोडीचा गुन्हा त्याचे इतर साथीदार ०२ विधीसंघर्षग्रस्त बालक यांचेसह संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता त्याने या गुन्हयाव्यतीरिक्त पोलीस ठाणे कळमणा—०१ वाहनचोरी व अजनी हद्यीत एक वाहनचोरी असे एकुण ०३ गुन्हे केल्याचे सांगीतले. आरोपीस गुन्हयात अटक करून त्यांचे ताब्यातुन चोरी केलेले सोनेचांदीचे वेगवेगळे दागिने, ०४ घडयाळी असा एकुण १,८९,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी तथा ०२ विधीसंघर्षग्रस्त बालक यांना मुद्देमालासह पुढील कारवाईकामी नंदनवन पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. निकेतन कदम, पोलीस उप आयुक्त (अति. कार्य. डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली मपोनि. श्रीमती नंदा मनगटे व त्यांचे पथकाने यांनी केली.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगीरी :— दुकान फोडणाऱ्या आरोपीस अटक, एकुण ०५ गुन्हे उघडकीस.**

फिर्यादी पंकज मधुकर बिनेकर वय ३७ वर्षे, रा. प्लॉट नं. १७, नेताजी नगर, श्रीराम चौक, कळमणा, नागपुर यांचे राहते घरीचे प्लॉटमध्ये दुकान आहे. दिनांक २८.०४.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २९.०४.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, फिर्यादीने आपले दुकान बंद करून, घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे शटरचे कुलूप तोडून, दुकानात प्रवेश करून, दुकानातील काऊंटर मधील रोख ४६,५००/— रू. चोरून नेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपींना निष्पन्न केले. आरोपी क्र. १) मोहम्मद दिलशाद सफर अंसारी वय २३ वर्षे, रा. गरीबनवाज नगर, हेमराज किराणा स्टोअर्स जवळ, यशोधरानगर, नागपुर २) विवेक उर्फ विकी युवराज धोटे वय २३ वर्ष रा. संजीवनी क्वॉटर्स, गल्ली क्र. १, यशोधरानगर, नागपूर ३) पियुष उर्फ गुद्दू दीपक निमजे वय २० वर्ष रा. विटाभट्टी चौक, महालक्ष्मी किराणा स्टोअर्स जवळ, यशोधरानगर, नागपूर यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपींना अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे कोतवाली हद्दीत एक घरफोडी, नंदनवन, यशोधरानगर, जरीपटका हद्दीत प्रत्येकी एक वाहनचोरी असे एकूण ०५ गुन्हे केल्याचे सांगीतले. आरोपींचे ताब्यातुन रोख २,७८०/—रू., ई—रिक्षा क्र. एमएच ४९ सीएक्स ०२३३, ॲक्टिवा मोपेड क्र. एमपी २० एसके ९९३५ व ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ४९ के ९८३५ असा एकुण १.४३,७८०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव कळमणा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. महेश सागळे व त्यांचे पथकाने केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०४.२०२६ चे १२.०० वा. ते १५.४० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, प्लॉट क्र. ३४६, नागार्जुन कॉलनी, नागपुर येथे राहणारे फिर्यादी दिनेश देवराव राऊत वय ४२ वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून परिवारासह लग्न समारंभाकरीता कळमेश्वर येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे गेट व मुख्य दाराचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करून, हॉलमधील लोखंडी आलमारीचे लॉकर तोडून त्यातील रोख ६०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने, रोलेक्स कंपनीचे हातघडयाळ, लॅपटॉप असा एकुण किंमती २,३१,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. तसेच फिर्यादीचे घराशेजारी राहणा—या श्रीमती महिला धमेंद्र बन्सोड वय २६ वर्ष रा. प्लॉट क्र. ६२९, नागार्जुन कॉलनी, जरीपटका हया घरी नसतांना कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करून, बेडरुमधील लोखंडी आलमारीतील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने,एकुण किंमती

१,२३,६००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला. अज्ञात चोरटयांनी फिर्यादी तथा त्यांचे शेजारी हे घरी नसतांना त्यांचे दोन्ही घरातील एकूण ३,५५,१००/– रु. चा मुद्येमाल चोरुन नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे मपोउपनि. कल्पना कटारे ९५१८७९५७७६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे पाचपावली :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या दोन मालवाहू वाहन चालकांविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ३०.०४.२०२६ चे १५.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत समर्पण हॉस्पिटलकडून रानी दुर्गावती चौकाकडे जाणारे मार्गावरील बिकानेर पीओपी सेल्स दुकानासमोर चारचाकी मालवाहू वाहन क्र. एमएच ०५ बीके ६९६० चे चालकाने त्याचे वाहन विरुध्द दिशेने रस्त्याचे पांढ–या रेषेचे पलीकडे नो पार्कींग झोनमध्ये उभे ठेवले होते. फिर्यादी हे त्यांचे पत्नीसह डबलसीट त्यांचे प्लॅटीना दुचाकी क्र. एमएच ४० एझेड ७६२९ ने घटनास्थळावरुन जात असता त्यांची दुचाकी बंद पडल्याने, रत्यावर नो पार्कींग झोनमध्ये उभ्या असलेल्या वाहनासमोर त्यांनी दुचाकी थांबविली. फिर्यादी यांची पत्नी दुचाकीवरुन खाली उतरुन फिर्यादीचे मागे पायी चालत येत असता त्यांचे मागून येणा–या चारचाकी मालवाहू वाहन क्र. एमएच ४० सीटी ००९८ चे चालक नामे भास्कर ब्रिजलाला राऊत वय ४२ वर्ष रा. न्यु खसाळा, रवि पारधीचे घराजवळ, कामठी रोड, नागपूर याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे पत्नीला जोरदार धडक देवून फरफटत नो पार्कींग झोनमध्ये उभ्या असलेलया मालवाहू वाहनावर धडकला. तसेच समोर पायी जाणाऱ्या फिर्यादीस धडक देऊन त्यांचे गुडघ्याला मार लागल्याने ते किरकोळ जखमी झाले. अपघातामध्ये फिर्यादी याची पत्नी गंभीर जखमी झाल्या. लोकांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीचे पत्नी नामे श्रीमती केसरबाई टुंडीलाल शरणागत वय ४३ वर्ष यांना तपासून मृत घोषित केले. फिर्यादीचा उपचार मेयो हॉस्पीटल येथे करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादी टुंडीलाल भोलाराम शरणागत वय ५३ वर्षे रा. प्लॉट क्र. ५०, लाभ लक्ष्मीनगर, कळमणा वस्ती, नाका नं. ४, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून मपोउपनि सुजाता शेळके ९०७५६४३९६६ यांनी पोलीस ठाणे पाचपावली येथे दोन्ही मालवाहू चालकाविरूध्द कलम १०६(१),१२५(अ),२८१,२८५ भा.न्या. सं., सहकलम १२२,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करुन मालवाहू वाहन क्र. एमएच ४० सीटी ००९८ चे चालक नामे भास्कर ब्रिजलाला राऊत वय ४२ वर्ष यास अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (मिसिंग)

**<u>१) पोलीस ठाणे जरीपटका</u> :–** श्रीमती दसवंती अनिल पंचेसर वय ३५ वर्षे, रा. दिपक लाडे यांचे घरी किरायाने, समता नगर, जरीपटका, नागपूर हया दिनांक २२.०४.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे जरीपटका हद्यीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता, घरून कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाहीत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाहीत. **<u>वर्णन–</u>** रंग–गोरा, चेहरा–गोल, डोळे–काळे, बांधा–सडपातळ, उंची– ५ फुट, केस– काळे पांढरे, अंगात– काळया रंगाची साडी घातलेली आहे. भाषा– हिंदी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे मानकापूर</u> :–** लक्ष्मी उर्फ श्रृती दिपक वारखेडे वय २२ वर्षे रा. गायत्रीनगर, संघदीप बुध्दविहाराजवळ, मानकापूर, नागपूर ही दिनांक ३०.०४.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे मानकापूर हद्यीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता, घरून कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता, मिळून आली नाही. **<u>वर्णन–</u>** रंग–गोरा, चेहरा–गोल, डोळे–काळे, बांधा–मध्यम,

उंची– ५ फुट ६ इंच, केस– काळे लांब, अंगात– हिरव्या रंगाचा सलवार सुट घातलेला असून काळया रंगाचा स्कार्फ सोबत आहे. भाषा– हिंदी बोलते.



श्रीमती दसवंती



लक्ष्मी उर्फ श्रृती

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**